# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक १८ डिसेंबर, २०२३ / अग्रहायण २७, १९४५ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये मंत्री** | |
| **(३)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** | |
| **(४)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | |
| **(५)** | **अल्पसंख्यांक विकास व औकाफ, पणन मंत्री** | |
| **(६)** | **शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री** | |
| **(७)** | **अन्न व औषध प्रशासन मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### सावडाव-नेर्ले, मिळंद-हातदे (जि.रत्नागिरी) या गावांना जोडणारा नवीन साकव बांधण्याबाबत

**(१) * ७२५०४ श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जामदाखोरे (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) येथील सावडाव-नेर्ले, मिळंद-हातदे या गावांना जोडणारा लोखंडी साकव सन २०१९ मध्ये झालेल्या अतिवृष्टीत वाहून गेला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चार वर्षे उलटूनही वाहून गेलेल्या लोखंडी साकवाची दुरुस्ती अथवा पर्यायी व्यवस्था शासनाने केलेली नसल्याने सदर परिसरातील विद्यार्थ्यांना उच्च माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी नेर्ले येथे १४ किलोमिटर अंतराचा वळसा मारुन जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी करुन जामदाखोरे परिसरातील वाहून गेलेल्या लोखंडी साकवाच्या ठिकाणी नवीन साकव बांधण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) सदर लोखंडी साकव सन २०२१ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे वाहून गेले आहेत, हे खरे आहे.

(२) सावडाव-नेर्ले येथील साकव वाहून गेल्याने पावसाळ्याच्या कालावधीत या परिसरातील विद्यार्थ्यांना नेर्ले येथे उच्च माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी सुमारे ७-८ किलोमीटर अंतराचा वळसा मारून जावे लागते, हे खरे आहे.

(३) वैभववाडी तालुक्यातील नेर्ले व राजापूर तालुक्यातील सावडाव या गावांना जोडणारा वाघोटन नदीवरील साकव योजनाबाह्य रस्त्यावर आहे. सदर जागी नवीन साकव बांधणेचा रु.६०.०० लक्ष रकमेचा जिल्हा नियोजन समिती, सिंधुदूर्ग यांचेकडे सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता प्राप्त झाल्यानंतर काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

राजापूर तालुक्यातील मिळंद-हातदे या दोन गावांना जोडणारा साकव योजनाबाह्य रस्त्यावर आहे. सदर जागी साकव बांधकाम करणेचे रक्कम रु.५५.०० लक्ष चे काम मंजूर आहे. तथापि, सदर साकवाच्या कामासाठी रु.१०५.०० लक्ष रकमेची आवश्यकता आहे.

साकव बांधकाम करणे खर्चाची कमाल आर्थिक मर्यादा रु.६०.०० लक्ष असून सदर मर्यादा वाढविण्याची बाब शासन स्तरावर विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुलगाव (ता.देवळी, जि.वर्धा) येथील कृषि उत्पन्न बाजार समितीच्या गोदामामध्ये अवैधरित्या सापडलेला तांदुळाचा साठा

**(२) * ७४७४९ श्री.रणजीत कांबळे (देवळी) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुलगाव (ता.देवळी, जि.वर्धा) येथिल कृषि उत्पन्न बाजार समिती मधील परवानाधारक व्यापारी व पणन महासंघाचा खुल्या बाजारातून शेतमाल खरेदीचा परवाना असलेल्या एका व्यापाऱ्याच्या गोदामावर पुरवठा निरीक्षक, देवळी, (जि.वर्धा) यांनी दाखल केलेल्या तक्रारीनुसार माहे ऑगस्ट / सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान छापा टाकला असता सुमारे १०० टन तांदुळाचा अवैध साठा आढळून आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कृषि उत्पन्न बाजार समिती, पुलगाव अंतर्गत तांदुळाचे उत्पादन होत नसताना देखील गोदामामध्ये एवढया मोठ्या प्रमाणात अवैधरित्या आढळून आलेल्या तांदुळाच्या साठयाबाबत चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार :** (१) व (२) हे खरे नाही.

कृषि उपन्न बाजार समिती, पुलगाव गोदामामध्ये तांदुळाचा शेतमाल साठा नाही. तसेच तेथे कुठल्याही प्रकारचा छापा पडलेला नसून अवैध साठा आढळून आलेला नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विदर्भात संत्र्यांची निर्यात करण्यासाठी निर्यात सुविधा केंद्र स्थापन करण्याबाबत

**(३) * ७२७०७ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भात दरवर्षी सरासरी १२ ते १५ लाख मेट्रिक टन संत्र्याचे उत्पादन होत असून यातील ३० टक्के म्हणजेच ३.६ ते ४.५ लाख मेट्रिक टन संत्री निर्यातक्षम असतानाही शासनाने अद्यापपर्यंत एकही निर्यात सुविधा केंद्राची निर्मिती केली नसल्याचे दिनांक १२ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संत्र्यासह इतर लिंबूवर्गीय फळांची निर्यात करण्यासाठी कृषि आणि प्रक्रिया केलेली अन्न उत्पादने निर्यात विकास प्राधिकरण व भारतीय कृषि संशोधन परिषद केंद्रीय कापूस संशोधन संस्था (अपेडा आणि आयसीएआर-सीसीआरआय) यांच्यात दिनांक ९ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास सामंजस्य करार करण्यात आला असतानाही या दोन्ही संस्थांनी कोणतेही प्रभावी काम न केल्याने या कराराचा संत्रा उत्पादकांना कोणताही फायदा झाला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार :** (१) विदर्भात मोठया प्रमाणावर निर्यातक्षम संत्र्याचे उत्पादन होते, हे खरे आहे. तथापि, राज्यात फळे, फुले व भाजीपाल्याच्या निर्यातीसाठी केंद्र व राज्य शासनाच्या सहाय्याने महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत एकूण ४५ आधुनिक निर्यात सुविधा केंद्रे कार्यरत आहेत. त्यापैकी विदर्भात ७ निर्यात सुविधा केंद्र असून, विशेषत: संत्र्यासाठी कारंजा घाडगे, जि.वर्धा व वरुड, जि.अमरावती येथे संत्रा निर्यात सुविधा केंद्रे कार्यरत आहेत.
(२) केंद्र शासनाच्या कृषि आणि प्रक्रिया केलेले अन्न उत्पादने निर्यात विकास प्राधिकरण (APEDA) व भारतीय कृषि संशोधन परिषद-केंद्रीय लिंबूवर्गीय संशोधन संस्था (ICAR-Central Citrus Research Institute) यांच्यामध्ये सामंजस्य करार झाल्यानंतर केंद्रीय लिंबूवर्गीय संशोधन संस्थेने विदर्भासह इतर राज्यातील संत्रा उत्पादकांसाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम, क्षेत्रभेट व कार्यशाळा इत्यादी आयोजित केल्या आहेत. सदर संस्थेमार्फत सन २०२१ ते २०२३ या कालावधीत जवळपास ४००० शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

तसेच रोगमुक्त लिंबूवर्गीय लागवड साहित्य उपलब्ध करुन देण्यासाठी एकूण ४ सामंजस्य करार करण्यात आले असून त्याअंतर्गत ५० लाखपेक्षा जास्त साहित्याचे वाटप शेतकऱ्यांना करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठामार्फत घेण्यात आलेल्या पदव्युत्तर स्तरावरील परिक्षेच्या निकालास विलंब होत असल्याबाबत

**(४) * ७६६४४ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठामार्फत पदव्युत्तर स्तरावरील राज्यशास्त्र अभ्यासक्रमाच्या चौथ्या सत्राची लेखी परिक्षा दिनांक ३१ मार्च, २०२३ व दिनांक ३ एप्रिल, २०२३ रोजी तसेचप्रात्यक्षिक आणि तोंडी परिक्षा दिनांक २५ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास घेण्यात आल्यानंतर ६ महिन्यांचा कालावधी होऊनदेखील निकाल न लागल्याने विद्यार्थ्यांना अनेकअडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, निकालाच्या दिरंगाईबाबत विद्यापीठाच्या तक्रार निवारण कक्षाकडे ऑनलाईन पध्दतीने तक्रार नोंदविली असता विद्यार्थ्यांना विद्यापीठाकडून कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार मुंबई विद्यापीठातील परिक्षांच्या निकालास विलंब करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्यासह निकाल तात्काळ जाहिर करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
निकालाच्या दिरंगाईबाबत विद्यापीठाच्या तक्रार निवारण कक्षाकडे ऑनलाईन पद्धतीने तक्रार प्राप्त नाही.
(३) मुंबई विद्यापीठाकडून प्राप्त माहितीनुसार सदर परीक्षा दूर व मुक्त अध्ययन संस्था (I.D.O.L) च्या अभ्यासक्रमांची होती व या परीक्षेचा निकाल दिनांक १८ ऑक्टोबर, २०२३ रोजी जाहिर करण्यात आला आहे. दूर व मुक्त अध्ययन संस्था विभागामध्ये नियमित शिक्षकांची कमतरता असल्यामुळे उत्तरपुस्तिकांच्या मुल्यांकनासाठी वेळ लागत असल्याने निकाल जाहिर करण्यास विलंब झाला आहे.
परीक्षा व मुल्यमापनची कार्यवाही विद्यापीठांकडून हाताळण्यात येत असून निकाल विहित मुदतीत जाहिर करण्यासाठी परीक्षेदरम्यान विद्यार्थ्यांचे ऑनलाईन हजेरी नोंद करणे, उत्तरपुस्तिकेवर QR code चा वापर करणे तसेच परीक्षा कामकाजाचा आढावा घेण्यासाठी Dashboard ची निर्मिती इत्यादी तांत्रिक उपाययोजना विद्यापीठाकडून करण्यात आल्या आहेत. याशिवाय उत्तरपुस्तिकांचे मुल्यांकन जलद गतीने होण्यासाठी विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील वरिष्ठ प्राचार्य व शिक्षक यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली विद्यापीठामार्फत करण्यात आली आहे, समूह महाविद्यालयांची निर्मिती केली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नाशिक शहरात भेसळयुक्त मिठाईची होत असलेली विक्री**

**(५) * ७८१४३ श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील देवळाली कॅम्प, कळवण, मालेगाव येथील नामांकित हॉटेल्स, दुकानदार, शहरातील आशिर्वाद डेअरी, देवीकृपा फुड प्रॉडक्टस या दुकानांमधून अन्न पदार्थ व मिठाईत भेसळ होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक शहरातील मे. मधुर फुड प्लाझा या मिठाईच्या दुकानात दिवाळीत भेसळयुक्त मिठाई आढळून आल्याचे माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर दुकानात विक्रीसाठी प्लास्टिकच्या डब्यांमध्ये साठविलेल्या श्रीखंडाच्या डब्यांवर बॅच नंबर, उत्पादन केल्याची तारीख, एक्सपायरी डेट तसेच उत्पादन कुठे व कोणी केले यासंदर्भातील कोणताही तपशील नमूद केला नसल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अशा भेसळयुक्त मिठाई विक्रीस प्रतिबंध करण्यासह संबंधित दोषी दुकानदार व अधिकारी/कर्मचारी यांचेवर नियमानुसार कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) अन्न व औषध प्रशासनाच्या नाशिक कार्यालयाने दि.०१.०८.२०२३ रोजी मे. देवीकृपा फुड प्रोडक्ट्स, पंचवटी, नाशिक या पेढीची तपासणी करून तेथून शेव फरसाण इत्यादींचे ६ नमुने विश्लेषणासाठी घेतले होते.

अन्न विश्लेषक, सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, नाशिक यांनी सदर ६ अन्न नमुन्यांपैकी मद्रास फरसाण या अन्न पदार्थामध्ये खाद्यरंग (Synthethic food colour) आढळून आल्याने सदर अन्न नमुना असुरक्षित घोषित करण्यात आला आहे. त्यानुषंगाने पुढील चौकशी करून मा. न्यायालयात खटला दाखल करण्यात येत आहे. तसेच, शेव या अन्न पदार्थाचे उर्वरित ४ अन्न नमुने हे प्रमाणित घोषित करण्यात आले आहेत. तथापि, त्यावर बॅच नंबर, उत्पादन केल्याची तारीख, एक्सपायरी डेट इत्यादी नमुद नसल्यामुळे संबंधितांविरूध्द न्यायनिर्णय खटला दाखल करण्यात येत आहे.

अन्न व औषध प्रशासनाच्या नाशिक कार्यालयाने दि.१८.०७.२०२३ रोजी मे.आशीर्वाद डेअरी, नाशिक या पेढीची तपासणी करून पनीर या अन्न पदार्थाचा नमुना भेसळीच्या संशयावरून विश्लेषणासाठी घेतला होता. अन्न विश्लेषक, सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, नाशिक यांनी सदर अन्न नमुना असुरक्षित घोषित केला असून, त्यानुसार पुढील चौकशी करून मा.न्यायालयात खटला दाखल करण्यात येत आहे. तसेच, दि.०६.११.२०२३ रोजी मे.मधुर फुड प्लाझा, सातपूर, नाशिक या आस्थापनेची तपासणी करुन तेथून खवा, मलाई बर्फी व श्रीखंड असे ३ अन्न नमुने घेवून श्रीखंडाच्या डब्यावर बॅच नंबर, उत्पादन केल्याची तारीख, एक्सपायरी डेट नसल्यामुळे तसेच उत्पादन स्थळाचा पत्ता चुकीचा असल्याने श्रीखंडाचा उर्वरित रु. १८,४५०/- किमतीचा साठा जप्त करून सिलबंद करून ठेवण्यात आला आहे. सदर अन्न नमुन्यांचे विश्लेषण अहवाल प्राप्त होताच त्याअनुषंगाने पुढील कारवाई करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे शहरात भेसळयुक्त पनीर आढळल्याबाबत**

**(६) * ७७४९१ श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात कर्नाटक येथून टेम्पोद्वारे आलेले ४९७० किलो पनीर पोलिसांनी दिनांक ०५ जुलै, २०२३ रोजी वा त्या सुमारास पकडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पनीर भेसळयुक्त तसेच आरोग्यास घातक असल्याचे प्रयोगशाळेच्या अहवालानुसार निष्पन्न झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे शहरात अशाप्रकारे होत असलेल्या अन्न भेसळीच्या घटनांकडे अन्न व औषध प्रशासन विभागाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन भेसळीच्या प्रकारांवर आळा घालून संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही.
(४) सहायक पोलीस निरीक्षक, दरोडा व वाहन चोरी विरोधी पथक १, गुन्हे शाखा, पुणे शहर तसेच अन्न व औषध प्रशासनाच्या पुणे कार्यालयाने दि. ०४.०७.२०२३ रोजी पुण्याच्या दिशेने येणारा टेम्पो क्र. एम. एच. १२, क्यू डब्ल्यू ७०११ या वाहनाची तपासणी केली असता, त्यामध्ये ४९७० किलो वजनाचा सुट्टया स्वरुपातील पनीरचा साठा प्रथमदर्शनी आढळून आला. सदरच्या साठयामधून अन्न व औषध प्रशासनाने वेगवेगळे तीन अन्न नमुने विश्लेषणासाठी घेवून राज्य आरोग्य प्रयोगशाळा, पुणे येथे विश्लेषणासाठी पाठविले व उर्वरीत पनीरचा साठा जप्त करण्यात आला.

पनीर या अन्न पदार्थाच्या तिन्ही अन्न नमुन्यांचे विश्लेषण अहवाल प्राप्त झाले आहेत. सदर अहवालांचे अवलोकन केले असता, ०२ अहवाल प्रमाणित दर्जाचे व ०१ अहवाल कमी दर्जाचा असल्याचे निदर्शनास आले. अन्न व औषध प्रशासनाच्या पुणे कार्यालयाने वरीलप्रमाणे प्रमाणित केलेले ०२ अन्न नमुने रेफरल प्रयोगशाळा, मैसूर यांचेकडे फेरविश्लेषणासाठी पाठविले. रेफरल प्रयोगशाळा, मैसूर यांचेकडून विश्लेषण अहवाल प्रमाणपत्र दि.०३.११.२०२३ रोजी प्राप्त झाले आहेत. सदर विश्लेषण अहवालाचे अवलोकन केले असता, ०१ नमुना प्रमाणित व ०१ नमुना कमी दर्जाचा घोषित झाला आहे.

त्याअनुषंगाने सदर दोन्ही अप्रमाणित अहवालासंदर्भात पुढील तपास करुन न्यायनिर्णय अर्ज दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वज्रेश्वरी (ता. भिवंडी) येथील भिवंडी - वाडा महामार्गाच्या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे युवकाचा झालेला मृत्यू

**(७) * ७२२४२ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वज्रेश्वरी (ता. भिवंडी) येथील भिवंडी-वाडा महामार्गाच्या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे तेथे मोठया प्रमाणात खड्डे पडले असून श्री.आकाश जाधव, वय २२ वर्ष या युवकाचा खड्डयांमुळे अपघात होऊन उपचारादरम्यान दिनांक ३१ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास दुर्देवी मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याचे निकृष्ट काम व त्यावरील अपघातास मे. जिजाऊ कन्स्ट्रक्शन रोड बिल्डर्स प्रा. लि. कंपनी जबाबदार असून त्यांच्यांविरुद्ध मृत व्यक्तिच्या नातेवाईकांनी दिनांक ७ सप्टेंबर, २०२३ रोजी गणेशपुरी पोलीस ठाण्यात सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल केला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या रस्त्यावरील अपघातांना जबाबदार असणाऱ्या कंत्राटदार कंपनीला काळया यादीत टाकणेबाबतची मागणी श्रमजीवी संघटनेने केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन यातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) व (२) गणेशपुरी पोलीस स्टेशन येथे सदर दुर्घटने बाबत दि.०७.०९.२०२३ रोजी प्रथम खबर अहवाल(F.I.R.) नोंदविण्यात आला आहे.
(३) सदर निवेदन प्राप्त नाही.

(४) गणेशपुरी पोलीस स्टेशन येथे सदर घटनेबाबत दि.०७.०९.२०२३ रोजी नोंदविण्यात आलेल्या प्रथम खबर अहवाल (F.I.R.) च्या अनुषंगाने तपासा अंती प्राप्त निष्कर्षानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक-औरंगाबाद प्रमुख राज्य मार्ग क्रमांक २ येथे उड्डाणपूल बांधण्याबाबत

**(८) * ७६६५८ ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक-औरंगाबाद प्रमुख राज्य मार्ग क्रमांक २ या मार्गावरील हॉटेल मिरची येथे खाजगी आराम बस व डंपर यांचा भीषण अपघात होवून खाजगी बसला लागलेल्या भीषण आगीत १३ प्रवाशांचा होरपळून मृत्यू झाला तर ४१ जण गंभीर जखमी झाल्याची घटना दिनांक ८ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी सन २०१३ ते आजगायत शेकडो अपघात होऊन अनेक जण मृत्यूमुखी पडले तर अनेक नागरिक जखमी झाले आहेत, सदर ठिकाण हे अतिधोकादायक अपघातप्रवण क्षेत्र असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अपघातप्रवण ठिकाणी तातडीने उड्डाणपूल बांधण्यात यावा यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी (नाशिक पूर्व) दिनांक १७ नोव्हेंबर, २०२३ रोजी व दिनांक ८ फेब्रुवारी, २०२३ रोजी मा.मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम मंत्री व सचिव (रस्ते) सार्वजनिक बांधकाम यांना लेखी निवेदनाद्वारे वारंवार मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर ठिकाणी उड्डाणपूल बांधण्याबाबतचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी कार्यकारी अभियंता, नाशिक यांनी दिनांक १६ ऑक्टोबर, २०२२ रोजी सचिव (रस्ते) सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच दिनांक १८ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) होय, सदर अपघात दि.८ ऑक्टोबर, २०२२ रोजी पहाटे ५:१५ वाजता झाल्याची नोंद आहे.
(२) संबंधित अपघात हा बस चालकाच्या निष्काळजीपणामुळे झाला असल्याची प्रथम खबर अहवालामध्ये नोंद आहे.
(३) होय.
(४) होय.
(५) व (६) सदर ठिकाणी उड्डाणपुलाचे बांधकाम करण्यासाठी रू.५० कोटी एवढ्या अंदाजित किंमतीच्या कामास माहे डिसेंबर, २०२३ च्या पुरवणी अर्थसंकल्पामध्ये मंजूरी देण्यात आलेली आहे.

सद्यस्थितीत सदर ठिकाणी सुरक्षात्मक उपाययोजना म्हणून गतीरोधक, झेब्रा क्रॉसिंग पट्टे आणि थर्मोप्लास्टिक पेंटने रंबलींगस्ट्रीप करण्यात आले आहेत. तसेच चौफुली अगोदर व पुढे संगमस्थळ (Intersection) व गतीरोधक असल्याची आगाऊ सुचना देणारे फलक बसविण्यात आले आहेत.

-----------------

## राज्यात पदभरती बंदीच्या कालावधीत शिक्षकांच्या बदल्यांमध्ये झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी होणेबाबत

**(९) * ७२५१४ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने लागू केलेल्या पदभरती बंदीच्या कालावधीत शिक्षकांच्या बदल्यांमध्ये झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याचे आदेश दिनांक १ डिसेंबर, २०२२ रोजीच्या परिपत्रकानुसार शालेय शिक्षण विभागाने दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू परिपत्रकानुसार ज्यांना बदल्या करण्याचे अधिकार आहे ते उपसंचालक, शिक्षण अधिकारी आणि शिक्षण निरीक्षक यांच्याकडेच सदर गैरव्यवहाराची चौकशी करण्याची जबाबदारी सोपविण्यात आल्याचे दिनांक १६ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तीन महिन्यांत सदरहू अहवाल सादर करण्याचे निदेश देऊनही १० महिन्यांचा कालावधी उलटल्यानंतरही अद्याप या प्रकरणी कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) हे खरे नाही
(४) आयुक्त (शिक्षण) यांचेकडून अंतरिम चौकशी अहवाल शासनास प्राप्त झालेला असुन, त्याअनुषंगाने आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात मध्यान्ह भोजन योजनेंतर्गत पूरक पोषण**
**आहार उपलब्ध करून देणेबाबत**

**(१०) * ७६२४३ श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मध्यान्ह भोजन योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना पुरेसा पोषण आहार मिळत नसून त्यात भाज्या, अंडी, फळे, चिक्की इत्यादींचा समावेश नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मध्यान्ह भोजन योजनेमध्ये देण्यात येणाऱ्या पोषण आहाराची गुणवत्ता दर्जेदार नसल्यामुळे विद्यार्थी हा आहार घेणे नापसंत करीत असून मध्यान्ह भोजन योजनेमध्ये करारात वार्षिक मेनू आधीच निश्चित करण्यात आल्याने आता त्यात बदल करणे शक्य नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नियमित दुपारच्या जेवणाव्यतिरिक्त आठवडयातून पाच दिवस दुध,अंडी, चिक्की असा पोषण आहार पुरविणाऱ्या केरळ, कर्नाटक, तामिळनाडूसारख्या इतर राज्यांच्या तुलनेत राज्यातील पोषण आहाराच्या अंमलबजावणीत मोठी तफावत दिसून येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन पुरेसा, दर्जेदार पोषण आहार देण्यासह आहारात दुध, अंडी, फळे व चिक्की यासारख्या पोषक पदार्थांचा समावेश करुन यातील दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) हे खरे नाही.
The Times of India या वृत्तपत्राच्या मुंबई आवृत्तीमध्ये दि.०३ ऑक्टोबर, २०२३ रोजी Maha midday meal: Dal-khichadi every day (no veggies, fruit, sweet) या आशयाची बातमी प्रसिध्द झाली आहे.
(२) हे खरे नाही.
प्रस्तुत योजनेंतर्गत तांदळापासून बनविलेल्या पाककृतीच्या स्वरुपात विद्यार्थ्यांना नियमितपणे पोषण आहार दिला जातो. योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या आहारामध्ये स्थानिक उपलब्ध अन्नधान्य, तृणधान्य व अन्य पदार्थांचा समावेश करुन आहाराचा दर्जा व पौष्टिकता वृध्दींगत करण्याच्या दृष्टीने याबाबत शास्त्रीय अभ्यास करण्यासाठी आरोग्य, आहार, शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींच्या समितीचे गठन शासन निर्णय दि.१५ मार्च, २०२३ अन्वये करण्यात आले आहे. सदर समितीच्या शिफारशीनुसार पाककृतीमध्ये बदल करणे प्रस्तावित आहे.
(३) व (४) योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या नियमित पोषण आहारासोबत आठवडयातून एक दिवस पूरक पौष्टिक आहाराचासुध्दा लाभ विद्यार्थ्यांना देण्यात येतो. तसेच, योजनेंतर्गत सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील २३

आठवडयांकरीता आठवडयातून एक दिवस  नियमित पोषण आहारासोबत अंडी/केळी यांचा समावेश करण्याचा निर्णय दि.०७ नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आलेला आहे. त्यानुसार सदर योजनेचा लाभ विद्यार्थ्यांना देण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात शिक्षकांची रिक्त पदे पवित्र पोर्टलद्वारे भरणेबाबत**

**(११) * ७१९१९ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), ॲड.आकाश फुंडकर (खामगांव), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव), श्री.अनिल बाबर (खानापूर), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.बबनराव पाचपुते (श्रीगोंदा), श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची ६० हजारांपेक्षा अधिक पदे रिक्त असून त्यापैकी ३० हजार शिक्षकांची भरती लवकरच करण्यात येईल अशी घोषणा मा.शिक्षणमंत्र्यांनी गत अधिवेशनादरम्यान केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा परिषदेच्या शाळांतील प्राथमिक शिक्षकांची पदे देखील रिक्त असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रलंबित शिक्षक भरती पूर्ण करावी यासाठी राज्यातील डी.एड, बी.एड अभियोग्यता धारकांनी पुण्यातील शिक्षण आयुक्त कार्यालयासमोर नुकतेच तीन दिवस उपोषण केले असून अनेक शिक्षक संघटना तसेच लोकप्रतिनिधींनी रिक्त पदे भरण्याबाबत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रिक्त जागा भरण्याच्यादृष्टीने शिक्षकभरतीचे वेळापत्रक जाहीर करण्यात आलेले असून देखील शासनाचे पवित्र पोर्टल अद्यापही सुरु न झाल्याने तसेच बिंदूनामावलीमध्ये देखील गैरप्रकार सुरु असल्याने पात्र उमेदवार कायमस्वरुपी नोकरीपासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, एकीकडे शासनाने रिक्त पदे तातडीने भरण्याची घोषणा करुनही दुसरीकडे कामगार विभागाच्या माहे सप्टेंबर, २०२३ च्या शासन निर्णयानुसार कंत्राटी पध्दतीने भरती करण्याचे आदेश शासनाने निर्गमित केले, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१), (२) व (३)  होय हे खरे आहे.
(४) अंशत: खरे आहे.

पवित्र पोर्टल सुरु झाले नाही, हे खरे नाही. तथापि, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बिंदू नामावलीमध्ये त्रूटी असल्याच्या तक्रारी शासनास प्राप्त झाल्या, हे खरे आहे.

बिंदुनामावलीतील त्रूटी दूर करुन बिंदुनामावली अद्ययावत करणेबाबत शासन स्तर तसेच आयुक्त स्तरावरुन व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे सर्व शिक्षणाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, सहाय्यक आयुक्त (मावक) यांना सूचना देण्यात आल्या असून, त्यानुसार बिंदुनामावली अद्ययावत करण्यात आली आहे.
(५) व (६) राज्यातील विविध विभाग/कार्यालयात बाह्ययंत्रणेमार्फत मनुष्यबळाचा पुरवठा करण्यासाठी दि.०६.०९.२०२३ च्या शासन निर्णयानुसार ९ सेवापुरवठादार संस्था/एजन्सीच्या पॅनलला मान्यता दिली होती. यामध्ये शिक्षक व सहायक शिक्षक ही पदे सुध्दा समाविष्ट होती. दरम्यान सदर शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने

दि.३१.१०.२०२३ च्या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात आलेला आहे. यास्तव राज्यातील शिक्षकांची रिक्त पदे ही शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणीमध्ये प्राप्त झालेल्या गुणांकनानुसार पवित्र पोर्टलमार्फत भरण्यात येणार आहेत.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पालघर जिल्ह्यातील आदिवासी विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहत असल्याबाबत**

**(१२) * ७१६४३ श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)पालघर जिल्ह्यात आदिवासी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी पुरेश्या जागा उपलब्ध होत नसल्याने अनेक विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) पालघर जिल्ह्यात जव्हार, मोखाडा व विक्रमगड तालुक्यांतील आदिवासी विद्यार्थ्यांसाठी असलेले गोखले एज्युकेशन सोसायटीचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात सन २०२३-२०२४ या शैक्षणिक वर्षात १७ अतिरिक्त आदिवासी विद्यार्थ्यांचे विज्ञान शाखेच्या प्रथम वर्षाकरिता तात्पुरते घेण्यात आलेले प्रवेश महाविद्यालयाने रद्द केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रवेश रद्द केल्याने आदिवासी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्याकरीता योग्य ती कार्यवाही करुन पालघर जिल्ह्यातील शैक्षणिक संस्थांना विद्यार्थ्यांचा कोटा (जागा) वाढवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
पालघर जिल्ह्यातील जव्हार तालुक्यातील गोखले एज्युकेशन सोसायटीचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील विज्ञान शाखेसाठी १२० विद्यार्थीसंख्येची एक तुकडी मंजूर आहे. सन २०२३-२४ मध्ये प्रथम वर्ष विज्ञान शाखेसाठी १२० विद्यार्थी प्रवेशित झाल्यानंतरही अतिरिक्त १७ विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी अर्ज केला होता. अतिरिक्त प्रवेशाच्या अनुषंगाने विद्यार्थी संख्येच्या २० टक्के जागा मंजूर करण्याच्या अनुषंगाने महाविद्यालयाने मुंबई विद्यापीठाकडे प्रस्ताव सादर केला होता व सदर प्रस्ताव मंजूर होईल असे गृहीत धरुन, विद्यापीठाने २० टक्के वाढीव जागा मंजूर केल्या नाही तर प्रवेश रद्द करण्यात येतील या अटीची पूर्वकल्पना देऊन व तसे हमीपत्र घेऊन महाविद्यालयाने या विद्यार्थ्यांना तात्पुरता प्रवेश दिला होता. महाविद्यालयाने मुंबई विद्यापीठाकडे सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने विद्यापीठ स्तरावर नियुक्त करण्यात आलेल्या समितीने महाविद्यालयाचा प्रस्ताव निकषांची पुर्तता करीत नसल्याने अमान्य केला. त्यामुळे, महाविद्यालयाने या अतिरिक्त १७ विद्यार्थ्यांचे तात्पुरते प्रवेश रद्द केले आहेत.
(३) हे खरे नाही.
या १७ विद्यार्थ्यांना जवळच्या इतर महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेण्यासाठी गोखले एज्युकेशन सोसायटीचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाकडून मार्गदर्शन करण्यात आले असून १३ विद्यार्थ्यांनी जवळच्या इतर महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेतले आहेत.
(४) विद्यार्थी संख्या वाढवून देण्याबाबत शैक्षणिक संस्थांनी मुंबई विद्यापीठाकडे सादर केलेल्या प्रस्तावापैकी पालघर जिल्ह्यातील प्राप्त एकूण १२ प्रस्तावांपैकी निकषांची पुर्तता करणा-या ०८ प्रस्तावांना विद्यापीठस्तरीय समितीने मान्यता दिलेली असून निकषांची पुर्तता न करणारे ०४ प्रस्ताव अमान्य करण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक तालुक्यात रेशन दुकानदार शासनाने निश्चित केलेल्या दरापेक्षा अधिक शुल्क आकारत असल्याबाबत

**(१३) * ७१६८२ श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तहसिलदार, नाशिक यांनी दिलेल्या आदेशान्वये रेशन दुकानांची तपासणी केली असता नाशिक तालुक्यात १३४ रेशन दुकानांपैकी २० दुकानांमध्ये शासनाने निश्चित केलेल्या दराच्या तीस पट अधिक शुल्क नागरिकांकडून आकारल्याचे दिनांक २८ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागरिकांकडून अधिक शुल्क आकारणाऱ्या दुकानदारांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तोंडार (ता. उदगीर, जि.लातूर) येथील जिल्हा परिषद शाळेत निकृष्ट दर्जाच्या पोषण आहारामुळे विद्यार्थ्यांना झालेली विषबाधा

**(१४) * ७१६७८ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राजेश एकडे (मलकापूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तोंडार (ता.उदगीर, जि.लातूर) येथील जिल्हा परिषद शाळेत निकृष्ट दर्जाची खिचडी खाल्ल्याने १५ विद्यार्थ्यांना विषबाधा झाली असल्याचे दिनांक १३ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपचारासाठी दाखल केलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी निकृष्ट दर्जाचा तांदुळ तसेच खिचडीमध्ये अळया असून हरभरे ही किडके असल्याचा आरोप केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) अंशत: खरे आहे.

दि.१२ सप्टेंबर, २०२३ रोजी जिल्हा परिषद शाळा, तोंडार, ता. उदगीर जि.लातूर या शाळेतील १६ विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार सेवन केल्यानंतर उलटी व मळमळीचा त्रास सुरू झाला होता.

(२) हे खरे आहे.

(३) संबंधित शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक यांना निलंबित करण्यात आले असून संबंधितांविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आली आहे. तसेच, संबंधित स्वयंपाकी यांना कामावरुन कमी करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ठाणे व रायगड जिल्हातील आदिवासी विकास महामंडळाच्या**
**केंद्रात भाताच्या खरेदीत गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(१५) * ७१९७० श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास महामंडळाच्या साकडबाव व वेहळोली (ता.शहापूर, जि.ठाणे) तसेच सुगवे (ता.कर्जत, जि.रायगड) अशा तीन केंद्रांतर्गत ५० हजार क्विंटल भातापैकी सुमारे साडेचार कोटी रुपयांच्या १४ हजार क्विंटल भाताची बोगस खरेदी झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन महामंडळाच्या जव्हार प्रादेशिक व्यवस्थापकाकडे दिनांक १७ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास अहवाल सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे नोव्हेंबर २०२२-२३ मध्ये १६ कोटी रुपयांच्या सुमारे ५३ हजार क्विंटल बोगस भात खरेदी केल्याचे तसेच ठाणे व रायगड जिल्ह्यातील १८ भात खरेदी केंद्रांतर्गत येणाऱ्या ४० गोदामांची तपासणी केली असता शहापूर व कर्जत तालुक्यातील केंद्रात बोगस भात खरेदी झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

ठाणे व रायगड जिल्ह्यातील ७ खरेदी केंद्रांतर्गत येणाऱ्या २५ गोदामांची तपासणी करण्यात आली आहे.

(४) साकडबाव, वेहळोली (ता.शहापूर, जि.ठाणे) तसेच सुगवे (ता.कर्जत, जि.रायगड) येथे झालेल्या गैरव्यवहार प्रकरणी महामंडळाचे जबाबदार अधिकारी तसेच संबंधित संस्थेचे पदाधिकारी यांचेविरुध्द स्थानिक पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्याबाबतचे निर्देश प्रादेशिक व्यवस्थापक, जव्हार यांना देण्यात आलेले असून महामंडळाच्या अधिकारी व कर्मचारी यांचेवर विभागीय चौकशीची कारवाई सुरु करण्यात आली आहे.

खर्डी येथे झालेल्या गैरव्यवहार प्रकरणी देखील संबंधित संस्थेचे पदाधिकारी तसेच महामंडळाचे अधिकारी व कर्मचारी यांचेविरुध्द शहापूर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महामंडळाच्या संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना निलंबित करण्यात येऊन त्यांची विभागीय चौकशी प्रस्तावित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शिवभोजन थाळी योजना बंद करण्यात आल्याबाबत**

**(१६) * ७२३०९ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.राजेश एकडे (मलकापूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने गरीब व गरजू लोकांसाठी १० रुपयांत सुरु केलेली शिवभोजन थाळी योजना शासनाने बंद केली असल्याचे दिनांक २७ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात अनेक ठिकाणी सुरु असलेली केंद्रे बंद होण्याची अनेक कारणे असून काही चालकांनी निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक थाळयांची विक्री झाल्याचे दाखवून शासनाकडून जादा अनुदान लाटण्याचा प्रयत्न करणे, काही केंद्रचालकांनी स्वत:च ही केंद्रे बंद करणे तसेच योजनेच्या अंमलबजावणीत होत असलेले गैरप्रकार इ. कारणांमुळे या

योजनेचा लाभ घेणाऱ्या गरजू व गरीब जनतेची उपासमार होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू योजना पुन्हा सुरु करण्यात यावी अशी मागणी सर्वच स्तरावरून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन सदर योजनेच्या अंमलबजावणीतील त्रुटी, उणिवा व गैरप्रकार दूर करणेसह योजनेच्या अटी व शर्ती व निकषांमध्ये योग्य ते बदल करुन ही योजना पुन्हा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) हे खरे नाही.

राज्यातील गरीब व गरजू जनतेला सवलतीच्या दरात भोजन उपलब्ध करून देण्यासाठी शिवभोजन योजना अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचा शासन निर्णय, दि.०१ जानेवारी, २०२० अन्वये दि. २६.०१.२०२० पासून सुरु करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत शिवभोजन योजनेचा प्रतिदिन इष्टांक २.०० लक्ष इतका आहे. सदर २ लक्ष इष्टांकाचे पूर्णत: वाटप करण्यात आले असून सध्या राज्यात १७८३ शिवभोजन केंद्रे कार्यरत आहेत.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नायगांव (पूर्व) (जि.पालघर) येथील पूर्व- पश्चिम मार्गाला जोडणाऱ्या उड्डाणपुलाला तडे गेल्याबाबत

**(१७) * ७६४२१ श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नायगांव (पूर्व) (जि.पालघर) येथील पूर्व-पश्चिम मार्गाला जोडणाऱ्या उड्डाणपुलाला तडे गेल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील एक वर्षापूर्वी सदर पुलाचे काम पूर्ण झाले असतांनाच पुलाला तडे गेल्याने पुल वाहतूकीसाठी धोकादायक ठरला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पुलाचे काम निकृष्ट दर्जाचे करणाऱ्या ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले,

(४) चौकशीच्या अनुषंगाने संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४)

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत नायगांव पूर्व पश्चिम जोडणाऱ्या उड्डाणपुलाचे काम हाती घेण्यात आले होते. सदर उड्डाणपुलाचे बांधकाम हे A१, A२ आणि A३ अशा तीन आर्ममध्ये करण्यात आले आहे. सदर उड्डाण पूल दि.३१.०३.२०२२ पासून वाहतूकीस खुला करण्यात आलेला आहे. सदर पुलातील आर्म A२ आणि A३ याची एकूण लांबी ११६४.४ मी व रुंदी १२ मी असून हा नायगांव पूर्व पश्चिम भागास जोडणारा मुख्य पूल आहे. उड्डाणपुलाच्या सदर भागास कोणत्याही प्रकारचे तडे गेल्याचे निदर्शनास आलेले नाही. त्यामुळे सदर पुलाचा भाग वाहतुकीसाठी धोकादायक नाही.

सदर पुलाच्या A१ आर्मचे (लांबी २५२ मी. व रुंदी ६.५ मी.) बांधकाम करण्यासाठी वापरण्यात आलेल्या काही RE पॅनलमधील अंतरात (Spacing) थोडया प्रमाणात वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे. तथापि, A१ आर्म हा नायगांव पूर्वेकडील रिक्षा स्टँडजवळ फक्त उड्डाणपुलावरुन उतरण्याकरिता बांधण्यात आला असून तेथील रिक्षा चालकांच्या विरोधामुळे अद्यापपर्यंत सदर भाग वाहतुकीसाठी खुला करण्यात आलेला नाही.

A१ आर्मच्या RE पॅनलमधील अंतरात झालेल्या वाढीच्या अनुषंगाने सदर पुलाची पाहणी हि व्ही.जे.टी.आय.या नामांकित अभियांत्रिकी संस्थेमार्फत करण्यात येत असून त्याबाबतचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर आवश्यक त्या उपाययोजना प्राधिकरणामार्फत करण्याचे नियोजित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**गंगाखेड-धारखेड (जि.परभणी) पुलाच्या भरावात**
**काळ्या मातीचा वापर केल्याबाबत**

**(१८) * ७७६८९ डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगाखेड-धारखेड (जि.परभणी) पुलाच्या भरावात काळया मातीचा वापर करण्यात येत असल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाच्या भरावात मुरुमाऐवजी काळया मातीचा वापर केल्याने सदर पुलाचे काम निकृष्ट दर्जाचे होत असून सदर पुलास धोका निर्माण झाल्याबाबत धारखेड, मुळी, नागठाणा येथील ग्रामस्थांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार करुन पुलाच्या भरावातील काळी माती काढून त्याजागी मुरुमाचा वापर करण्यात यावा अशी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही,

(२) हे खरे नाही,

(३) सदर पूलाच्या धारखेड बाजूच्या जोड रस्त्याकरीता तटरक्षक भिंत बांधण्याचे काम माहे जुलै ते ऑगस्ट, २०२३ दरम्यान चालू असतांना खोदकामातील माती, मुरुम हे तात्पुरत्या स्वरुपात ठेवण्यात आलेल्या जागेवरुन काढून टाकण्यात आलेली आहे. खोदकामामधील माती, मुरुम हे काढून टाकल्यानंतर जोडरस्त्याच्या मुख्य भरावात कठीण मुरुमाने सुमारे ६ ते ८ मीटर उंचीचा भराव करुन जोड रस्त्याचे काँक्रीटीकरण करुन बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे.

खोदकामातील माती, मुरुम हे जोडरस्त्याच्या मुख्य भरावात वापरण्यात आलेले नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**आर्वी येथील रोहणा-वाढोणा-कारंजा व खरांगणा-कोंढाळी**
**या रस्ते कामांच्या देयकांमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(१९) * ७८३८३ श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी येथील रोहणा-वाढोणा-कारंजा व खरांगणा-कोंढाळी या रस्त्यांची कामे HAM अंतर्गत पूर्ण झालेली असून बांधण्यात आलेल्या रस्त्यांची DLP १० वर्ष असून एकाच वर्षात रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडलेले असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता हा ७ मिटरचा असताना ३.५ मिटरचा करण्यात आला असून त्या रस्त्यांची देयके मात्र ७ मिटर रुंदी प्रमाणे अदा करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रस्त्याच्या दोन्ही बाजूने साईड पट्टयामध्ये मुरुम न भरता त्याची देयके अदा करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त रस्त्याच्या दोन्ही बाजूला नाली बांधकाम व पेव्हर ब्लॉक बसविण्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून बरेच ठिकाणी पेव्हर ब्लॉक व नालीचे बांधकाम न करता त्याची सुध्दा वाढीव देयके अदा करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर कामासाठी वाढीव देयके अदा करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची व कंत्राटदाराची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कारवाई करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) नाही.

(२) हे खरे नाही.

(३) सदर कामात समाविष्ट रस्त्याच्या लांबीतील काही भाग हा वनविभागाच्या हद्दीतून जात असल्याने, वन विभागाकडून अस्तित्वात असलेल्या रस्त्याच्या धावपट्टीच्या रूंदीच्या मर्यादेत राहून काम करण्यास परवानगी देण्यात आली. त्या अनुषंगाने रस्त्याच्या अस्तित्वातील रुंदीमध्ये मजबुतीकरण व डांबरीकरणासह सुधारणा करण्यात आली आहे. सवलत करारनाम्यातील तरतूदीप्रमाणे कामाचा Reduction in Scope चा प्रस्ताव मंजूर करण्यात आलेला आहे.

(४) व (५) हे खरे नाही.

सवलत करारनाम्यातील तरतुदींनुसार स्वतंत्र अभियंता यांचेमार्फत दैनंदिन पर्यवेक्षण तसेच गुणनियंत्रण करुन त्याचे शिफारशी नंतरच देयके अदा करण्यात आले आहे.

सदर काम हे सवलत करारनाम्यातील तरतुदींनुसार कार्यान्वित करण्यात आलेले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवापूर (जि.नंदूरबार) येथील आठ रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत

**(२०) * ७६६५४ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम),श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण),श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवापूर (जि.नंदूरबार) येथील सार्वजनिक बांधकाम उपविभागातील आठ रस्त्यांची एकूण रुपये २२ कोटी इतक्या रकमेची कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची केली असून या कामामध्ये कंत्राटदार व सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांच्या संगनमताने कोटयवधी रुपयांचा गैरव्यवहार होत असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्त्यांच्या कामांमध्ये गैरव्यवहार केलेल्या संबंधितांवर गुन्हा दाखल करण्याबाबतची मागणी स्थानिक नागरिक, संस्था-संघटनांनी दिनांक २८ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नाशिक यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ८ रस्त्यांच्या निकृष्ट कामांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून झाले, त्यानुषंगाने संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.

(२) सदर निवेदन प्राप्त नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.